महाराष्ट्र शासन
गृहनिर्माण विभाग
२ रा मजला, विस्तारित इमारत, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.

Email ID :do3.hou-mh@nic.in

दिनांक :- ११ ऑक्टोबर, २०२४.

क्रमांक: संकिर्ण-२०२३/प्र.क्र.२६६/झोपसु-१

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
प्रशासकीय इमारत, अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई -४०० ०५१.

विषय :- महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम ३ के अंतर्गत शासन निर्देश देण्याबाबत....

महोदय,

महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व पु.) अधिनियम, १९७१ या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी राज्य शासन, त्यास आवश्यक व इष्ट वाटेल अशा धोरणाच्या संबंधात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास सर्वसाधारण किंवा विशेष निर्देश देऊ शकेल आणि अशा निदेशांचे पालन करणे व त्यानुसार कृती करणे हे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणावर बंधनकारक राहील, अशी तरतूद उक्त अधिनियमाच्या कलम ३ के मध्ये करण्यात आलेली आहे.

२. रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना पूर्ण करण्यासाठी अभय योजना (Amnesty Scheme) राबविण्यास दि.२५.०५.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच ज्या वित्तीय संस्थांनी (RBI, SEBI, NHB मान्यता प्राप्त) योजनेच्या अंमलबजावणीसाठी निधी उपलब्ध करुन दिला आहे, त्यांची आशयपत्रामध्ये सह विकासक (Co-Developer) म्हणून नोंद घेण्याचे निश्चित केले. तसेच अभय योजनेंतर्गत वित्तीय संस्था/त्यांनी प्राधिकृत केलेल्या सक्षम संस्थेस रखडलेली योजना पूर्ण करण्यास मंजुरी देण्याच्या अनुषंगाने निर्णय घेण्यासाठी दि.१२.०७.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.

३. अभय योजनेंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाद्वारा प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करुन समितीच्या विचारार्थ पाठविलेल्या प्रस्तावावर समितीच्या वेळोवेळी पार पडलेल्या बैठकांमध्ये सविस्तर चर्चा करुन त्यातील काही योजना अभय योजनेंतर्गत राबविण्याची शासनास शिफारस केली आहे. सदर शिफारशीस शासनाने मान्यता दिली आहे.

४. आता, महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम ३के अन्वये शासनास प्राप्त झालेल्या अधिकारानुसार शासन पुढीलप्रमाणे निर्देश देत आहे:- अभय योजनेंतर्गत अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखालील समितीने केलेल्या शिफारशी व त्यास शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार न.भू.क्र.३२४,३२५, ३२६ आणि ३२७(पै), ३२७/१ ते ४, ३२८ आणि ३२८/१ ते ४, ३२८ आणि ३२८/१ ते ४ मोगरा व्हिलेज, आणि न.भू.क्र.१४४(पै) १४४/३१ आणि ३२, १४५(पै) व इतर के/पूर्व विभाग येथील जोगेश्वरी शिवदर्शन एस.आर.ए. गृहनिर्माण संस्था मर्या. व ३३ इतर गृहनिर्माण संस्था हि झोपडपट्टी पुनर्वसन योजना दि.२५.०५.२०२२ रोजीच्या शासन निर्णयातील अटी व शर्तींनुसार अभय योजनेंतर्गत पिरामल कॅपीटल ॲन्ड हौसिंग फायनान्स या वित्तीय संस्थेने प्राधिकृत केलेल्या मे. ॲस्पेक्ट ब्युल्डकॉन एल.एल.पी. या विकासकामार्फत राबविण्यात यावी.

५. सदर योजनेच्या अनुषंगाने पुढील बाबी विचारात घ्याव्यात:-

१) सदरचे आदेश दि.२५.०५.२०२२ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदी आणि महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम ३के अन्वये शासनास प्राप्त झालेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

२) महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम १३ (२) च्या तरतुदीमधील विहीत कार्यपद्धती अवलंबून प्रस्तुत योजनेतील सध्याचा विकासकासंदर्भात उचित कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांनी करावी.

३) नवीन विकासकाच्या नेमणूकीनंतर सुधारीत आशयपत्र निर्गमित करावे. तसेच संबंधित वित्तीय संस्थेची सह-विकासक म्हणून आशयपत्रात नोंद घ्यावी.

४) नवीन विकासकाची/वित्तीय संस्थांची नियुक्ती करण्याकरीता झोपडीधारकांच्या संमतीची, सर्वसाधारण सभेच्या मंजुरीची आवश्यकता राहणार नाही.

५) रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनांमधील झोपडपट्टीवासीयांचे लवकरात लवकर पुनर्वसन केले जाईल, हे सुनिश्चित करणे हा या योजनेचा एकमेव उद्देश आहे. त्यामुळें वित्तीय

संस्थेने सादर केलेल्या बार-चार्ट नुसार योजना पूर्ण होईल, याची झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने खबरदारी घ्यावी. सदर वित्तीय संस्थेने/विकासकाने पुनर्वसन घटकाचे बांधकाम विहीत कालावधीत पूर्ण न केल्यास दि.२५.०५.२०२२ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार दंड आकारणी करावी.

६) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या परिपत्रक क्र. २१० मधील तरतुदी या योजनेसही लागू राहतील.

७) विकासक/वित्तीय संस्थानी सर्व अटी व शर्तीचे पालन करण्याबाबतचे नोंदणीकृत हमीपत्र सादर केल्यानंतर तसेच विहीत नमुन्यामध्ये क्षतीपूर्ती बंधपत्र सादर केल्यानंतरच सदरचे आदेश लागू होतील.

८) नवीन विकासकास झोपडपट्टी पुनर्वसन धोरणाप्रमाणे ५% इतके अधिमूल्य भरण्याची अट राहणार नाही.

९) आर्थिक कुवतीबाबत प्रमाणपत्र (Annexure- III) सादर करणे सदर वित्तीय संस्थांना बंधनकारक राहील.

१०) अभय योजनेंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व पुं.) अधिनियम, १९७१ आणि विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील तरतुदी व त्यामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणा तसेच शासनाने/झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचना/शासन निर्णय / आदेश/परिपत्रके इत्यादी प्रस्तुत योजनेस लागु राहतील.

आपला,

(सु.बा. तुंबारे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२